# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २६/०७/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

### उल्हासनगर होणार अधिक सुरक्षित CCTV चे असेल लक्ष...

गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे माध्यमातून पोलिस प्रशासन ठाणे जिल्हा अंतर्गत परिमंडळ-4 उल्हासनगर शहरामध्ये सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसवण्याचा अत्याधुनिक प्रकल्प राबविला जाणार आहे. याबाबत गृह मंत्रालयाकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये काही अपग्रेडेशन करणे गरजेचे असून त्यासाठी येणारा कॅपिटल व ऑपरेशनल मेंटेनन्स खर्च, महापालिका तसेच शहरासाठी त्याचा काय फायदा असणार आहे. किती कॅमेरांची गरज आहे याची सर्व तपासणी राज्य शासनामार्फत होत आहे. सदर प्रकल्पाबाबत मा. मुख्यमंत्री महोदय देखिल आग्रही आहेत.

ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील परिमंडळ 1,2,3 व 4 या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीबाबत दि. 05/07/2023 रोजी मा. अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या अक्ष्यक्षतेखाली गृह विभाग, मंत्रालय, मुंबई येथे उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीची बैठकी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील मार्गदर्शक सुचनांच्या निर्णयावर अंमलबजावणी करणेकरिता आज दि. 26/07/2023 रोजी ठिक 11.30 वा उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती दालनात बैठकीचे नियोजन करण्यात आले होते. सदर बैठकीमध्ये डॉ. सुधाकर पठारे, पोलिस उप आयुक्त परिमंडळ-4, श्री.अजीज शेख, प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महागनगरपालिका, श्री. जयराज कारभारी, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर, डॉ. प्रशांत रसाळ, मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, श्री.योगेश गोडसे, मुख्याधिकारी, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद, डॉ. करुणा जुईकर, अति. आयुक्त (सेवा), श्री.जमीर लेंगरेकर, अति.आयुक्त (शहर), डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त (मार्तवि), अमोल काळे, सहायक पोलिस उप-आयुक्त व सर्व पोलिस निरीक्षक (हिललाईन, मध्यवर्ती, विठठलवाडी, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ), श्री. कन्नालु साहेब, सहा. पोलिस आयुक्त (बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर). उमपातील सर्व प्रभाग अधिकारी क्र. 1 ते 4 श्रीम. श्रध्दा बाविस्कर, सिस्टम मॅनेजर (मार्तवि), श्री. संदीप जाधव, उप अभियंता (साबांवि), सौ. छाया प्रकाश डांगळे, जनसंपर्क अधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

यामध्ये श्री. कन्नालु साहेब, सहा. पोलिस आयुक्त (बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर) यांनी ठाणे जिल्हा अंतर्गत परिमंडळ-1,2,3 व 4 करीता तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्पाची मुद्देनिहाय सभागृहाला माहिती दिली. सदर प्रकल्पाचा DPR निश्चित झाल्यानंतर किमान एक वर्ष प्रकल्प उभारणीसाठी लागणार आहे. प्रकल्प उभारणीसाठी अंदाजे खर्च रु.500 कोटी इतका असून यामध्ये Capital खर्च हा 60% व Operation & Maintenance खर्च हा 40% असणार आहे. यामध्ये महानगरपालिका व पोलिस विभागाच्या दृष्टीने कुठे कॅमेरे लावणे गरजेचे आहे यांचा संयुक्तरित्या सर्व्हे करुन ठिकाणे निश्चित करण्यात आलेली आहेत. सदर प्रकल्पामध्ये कोणत्या बाबींचा अंतर्भाव असणार आहे व यासाठी येणा-या खर्चामध्ये कशाप्रकारे संबंधित महानगरपालिका व नगरपरिषद यांनी आपले योगदान दयायचे आहे. याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

उल्हासनगर शहरातील सामान्य नागरिकांसाठी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून शहरामध्ये सातत्याने घडत असलेले अनेक गैरप्रकार, चोरी व गुन्हे यांना प्रतिबंध करणेसाठी तसेच शहरातील धोकादायक इमारती. शहरामध्ये होणारी ट्रफिक, शहरामध्ये साठत असलेले पाणी. पुरसदृश्य पाहणी. रस्त्यावरील खड्डे, इत्यादी अनेक बाबींची माहिती याव्दारे Single Click वर उपलब्ध होणार आहे. सदरचा प्रकल्प हा अतिशय महत्वाकांक्षी असुन उल्हासनगर शहराला तसेच संबंधित लगतच्या शहरांना देखिल विकासाच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने फायदा होणार आहे. सदरचा प्रकल्प हा पोलिस विभाग तसेच महानगरपालिकेला देखिल अतिशय उपयुक्त व फायदेशीर ठरणारा प्रकल्प आहे.

26/7/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.